**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः18.07.2024** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

- गडचिरोली पोलिसांनी केलेल्या कारवाईत 12 नक्षलवादी ठार

- तरुणांसाठी ' मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण '' योजनेअंतर्गत विद्यावेतन

- छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगडावरील शौर्याचे प्रतीक असलेली वाघनखं साताऱ्यात दाखल.

- ऑनलाइन ठगांना शेकडो सिमकार्ड पुरवणारी टोळी ठाणे पोलिसांद्वारे गजाआड आणि

- कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात जोरदार पावसाचा इशारा.

**महा-नक्षलवादी**

गडचिरोली-छत्तीसगड सीमेवरील एटापल्ली खंडामध्ये गडचिरोली पोलिसांच्या C-60 कमांडोंनी काल संध्याकाळी केलेल्या कारवाईत 12 नक्षलवादी ठार झाले. वांदोली गावाच्या जंगलात नक्षलविरोधी अभियान राबवणाऱ्या पोलिस दलावर नक्षलवाद्यांनी गोळीबार केला. पोलिसांनीही प्रत्युत्तरात गोळीबार केला. या चकमकीत 12 नक्षलवादी ठार झाल्याची माहिती गडचिरोलीचे पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली. घटनास्थळावरुन तीन एके-47 रायफलसह विविध शस्त्रंही जप्त करण्यात आली आहेत. सहा तास चाललेल्या या चकमकीत एक पोलीस उपनिरीक्षक आणि एक हवालदार जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी नागपूरला नेण्यात आलं आहे. उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली पोलिसांना त्यांच्या शौर्याबद्दल 51 लाख रुपयांचं बक्षीस जाहीर केलं.

**पंढरपूर**

पंढरपुरातील भक्ती मार्गावर बांधण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवनाचं भूमीपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते काल झालं. या सांस्कृतिक भवनासाठी शासनाने 5 कोटी रुपये मंजूर केले असून आणखी 10 कोटी रुपये मंजूर करण्यात येतील असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.मुलांसाठी ' मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना ' सुरू करण्यात येणार असून त्याद्वारे बारावीपर्यंत शिक्षण झाल्यास 6 हजार, पदविधारकांना 8 हजार आणि पदवीधरांना 10 हजार रुपये विद्यावेतन स्वरूपात मिळणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.तत्पूर्वी 'पर्यावरणाची वारी पंढरीच्या दारी' उपक्रमादरम्यान पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी ‘ एक वारकरी एक झाड ’ ही संकल्पना राबवून पालखी मार्गावर वृक्षारोपण करण्याचा सर्वांनी संकल्प करूया, असं आवाहन शिंदे यांनी केलं.

**निर्मलवारी**

यंदाची वारी, स्वच्छ वारी निर्मल वारी, सुरक्षित वारी ठरावी यासाठी चांगले प्रयत्न झाले असून तिरुपती बालाजीच्या धर्तीवर दर्शनरांग सुरू करण्यासाठी 103 कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. दरवर्षी पंढरीत येणाऱ्या वारकऱ्यांसाठी हजार खाटांचं रुग्णालय तसच वारी संपल्यावर पंढरपूर इथं स्वच्छता मोहीम सुरू करण्यात येईल असंही शिंदे यांनी म्हटलं आहे. आरोग्य विभागाच्या शिबिरात सहभागी झालेल्या 18 हजार कर्मचाऱ्यांचे त्यांनी आभार मानले. वारीच्या दिवसात 10 लाखांहून अधिक वारकऱ्यांनी या शिबिराचा लाभ घेतला

**आषाढी**

आषाढी एकादशी राज्यभरात पारंपरिक उत्साहात काल साजरी करण्यात आली.बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव इथं संत गजानन महाराज संस्थानमध्ये गजानन महाराजांच्या समाधी दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती.कोल्हापुर जिल्ह्यातील करवीर तालुक्यात नंदवाळ इथल्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात भजन कीर्तन आणि दिंडी काढून विठू नामाचा गजर सुरू होता.

परभणी जिल्ह्यातील मानवत मार्गावरील जिजाऊ ज्ञानतीर्थ विद्यालयात आषाढी यात्रेनिमित्त वृक्षदिंडी तर पालघर जिल्ह्यात वाड्यातल्या स्वामी विवेकानंद विद्यामंदिर आणि कनिष्ठ महाविद्यालयात व्यसनमुक्तीची दिंडी काढण्यात आली.धुळ्यात अनाथ मतिमंद बाळगृहात आषाढी एकादशी साजरी करण्यात आली.रत्नागिरी,सोलापूर,हिंगोली,जालना,बीड आदि जिल्ह्यात विठ्ठल–रुक्मिणी मंदिरांमधे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं.

**मोहरम**

राज्यात काल ठिकठिकाणी मोहरम पाळण्यात आला. अहमदनगरमध्ये बारा इमाम कोठला इथून ताबूत मिरवणुक काढण्यात आली. यानिमित्त मुस्लिम बांधवांनी उपवास केला. या दिवशी इस्लामिक नवीन वर्षाची सुरूवात होते.

**उद्घाटन**

गडचिरोली जिल्ह्यात सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून अहेरी तालुक्यातील वडलापेठ इथं 350 एकर जागेवर 10 हजार कोटी रुपयांच्या पोलाद प्रकल्पाचं भूमिपूजन काल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आलं. या कारखान्यामुळे आठ दशलक्ष टन लोह उत्पादन होईल असं फडणवीस यांनी सांगितलं. या कारखान्यामुळे अनेक आदिवासी उमेदवारांना रोजगार उपलब्ध होईल असं अजित पवार यावेळी म्हणाले.

**दूध**

राज्यातील अतिरिक्त दूधाचा प्रश्न सोडविण्यासाठी अमुल उद्योग समुहासह इतरही प्रक्रिया केंद्रानी अतिरिक्त 20 लाख लिटर दूधाचं संकलन करावं असं आवाहन दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलं आहे. दूध व्यवसायिक आणि सर्व प्रक्रीया केंद्राच्या प्रमुखांच्या बैठकीत ते काल मुंबईत बोलत होते. या प्रक्रिया केंद्रानी सहकार्य केल्यास  राज्यातील दूध उत्पादकांना 35 रुपये भाव

देणं शक्य होईल असं विखे-पाटील यांनी म्हटल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**वाघनखे**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतापगडावरील शौर्याचं प्रतीक असलेली लंडनच्या व्हिक्टोरिया अल्बर्ट संग्रहालयातली छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखं सातारा इथं काल पोहोचली. ही वाघनखं छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयात ठेवली जाणार असून पुढील सात महीने सकाळी दहा ते पाच या वेळेत नागरिकांना पाहता येणार आहेत.

**सीमकार्ड**

शेअर बाजारात गुंतवणुकीचं आमिष दाखवून लोकांना फसविणाऱ्या टोळीला सिमकार्ड पुरवणाऱ्या टोळीचा ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाच्या सायबर कक्षानं छडा लावून छत्तीसगढमधील अफताब ढेबर याच्यासह तिघांना अटक केल्याची माहिती ठाणे आर्थिक गुन्हे शाखेचे पोलिस उपायुक्त पराग मणेरे यांनी काल पत्रकार परिषदेत दिली. यातील चीन आणि दुबईचाही संबंध उघड झाला असून, 779 मोबाइल सिमकार्डसह 23 मोबाइल हस्तगत पोलिसांनी हस्तगत केले.

ऑनलाइन आर्थिक फसवणुकीसाठी सक्रिय टोळ्यांकडून बनावट शेअर ट्रेडिंग ॲप्लिकेशन साइट्स तयार करून त्यांच्या माध्यमातून गुंतवणूक केल्यास जादा परतावा देण्याचं आमिष दाखवलं जातं. सोशल मीडियाच्या माध्यमातून लिंक पाठवून गुंतवणुकीसाठी प्रवृत्त केलं जातं. अशा गुंतवणूकदारांना जाळ्यात ओढून त्यांच्या बँक खात्यामधील रक्कम ऑनलाइन वळती करून फसवणूक केली जाते.

ठाण्यातील सायबर सेलचे सहायक पोलिस निरीक्षक प्रदीप सरफरे यांना अशा 16 गुन्ह्यांचा एकत्रित तपास करीत असताना आरोपींनी फसवणुकीसाठी पीडितांसोबत व्हॉट्सॲप चॅटींगद्वारे संपर्क केलेल्या मोबाइल क्रमांकाच्या सीडीआर आणि व्हॉट्सॲप मेसेजिंगची माहिती मिळवली. 30 मोबाइलमधून वेगवेगळ्या राज्यातील 2600 मोबाइल सिमकार्डवरील व्हॉट्सॲप छत्तीसगड, त्रिपुरा आणि इतर ठिकाणांहून कार्यरत असल्याची, तसंच व्हॉट्सॲप आयपी हाँगकाँगमधील असल्याचीही माहिती

मिळाली. यासंदर्भात भारतात सिमकार्ड खरेदी करून ती दुबईमध्ये आर्थिक फसवणुकीसाठी टोळीला विकणारा दिल्लीचा भाईजान ऊर्फ हाफीज लईक अहमद यालाही अटक करण्यात आली आहे.

**मेळावा अनिकेत**

रत्नागिरीच्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आज पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या अनुषंगानं जिल्हा कौशल्य विकास, रोजगार आणि उद्योजकता विभागानं काल एकदिवसीय कार्यशाळा आयोजित केली होती. 108 उमेदवार या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

**भूकंप सातारा**

सातारा जिल्ह्यातील कोयनानगर आणि पोफळी परिसराला काल दुपारी साडेतीनच्या सुमाराला भूकंपाचा सौम्य धक्का बसला. त्याची तीव्रता 2 पूर्णांक 8 रिख्टर होती. पाटण तालुक्यातील हेळवाक गावाजवळ त्याचा केंद्रबिंदू होता.

**कबड्डी**

महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या वतीनं 71 व्या महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद  निवड चाचणी स्पर्धा पुण्यातल्या म्हाळुंगे बालेवाडी इथल्या क्रीडा संकुलात सुरू आहेत. स्पर्धेच्या तिसऱ्या  दिवशी झालेल्या सामन्यात  महिला विभागात पुणे ग्रामीण, पिंपरी चिंचवड, पुणे शहर, सातारा, मुंबई उपनगर पश्चिम, मुंबई शहर पश्चिम, नंदुरबार, पालघर या संघानी विजय मिळविले.

**गोसेखुर्द भंडारा**

गोसेखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रात सतत पाऊस होत असल्यामुळे धरणाचे पाच दरवाजे अर्ध्या मीटरनं उघडण्यात आले आहेत. त्यामुळं नदीपात्राजवळील गावांना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.

**पाऊस**

गोंदिया जिल्ह्यामध्ये दमदार पावसामुळं भात पिकाला मोठा लाभ झाला आहे. भंडारा जिल्ह्यात काल बऱ्याच प्रतीक्षेनंतर जोरदार पावसानं हजेरी लावली. पवनी तालुक्यातील कोंडा इथल्या आठवडी बाजारात पाणी शिरल्यानं संपूर्ण बाजार जलमय झाला होता. तसंच अनेकांच्या घरात पाणी शिरलं होतं. यंदाच्या हंगामातील पहिलाच पाऊस असल्यानं शेतकरी सुखावला आहे.

**हवामान**

राज्यात 21 जुलैपर्यन्त कोकण आणि मध्य महाराष्ट्रसाठी नारिंगी बावटा आणि मराठवाडा विभागासाठी पिवळ्या बावट्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. या प्रदेशात वाऱ्यांसह जोरदार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात वादळ आणि विजांसह पावसाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**